# फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनला पुरस्कार



पुणे : फिनोलेक्स इंडस्ट्रीज कंपनीला आणि त्यांचे सीएसआर भागीदार मुकुल माधव फाऊंडेशन यांना नॅशनल सीएसआर लीडरशीप काँग्रेस अँड अवॉर्ड्‌र्सतर्फे संस्थात्मक विभागात 'बेस्ट सीएसआर इंडिग्रेटेड बिझनेस' हा राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला. बेंगळुरू येथे हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया म्हणाल्या, नॅशनल सीएसआर लीडरशीप काँग्रेस ऑण्ड अवॉर्ड्‌र्सतर्फे हा मानाचा पुरस्कार मिळाल्याने आम्हाला आनंद झाला. सामाजिक बांधिलकी म्हणून असलेला आपला वाटा उचलणे, याच मार्गावरून एका यशस्वी व्यवसायाकडे जाता येते, या फिनोलेक्स इंडस्ट्री आणि एमएमएफमधील आमच्या विश्वासावर यामुळे शिक्कामोर्तब झाले आहे.''